गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.र.नं.२७/२०१७ (नागपाडा पोलीस ठाणे, गु.र.क्र.२६३/२०१७) मधून उद्भवणाऱ्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये कामकाज पाहण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या ॲड श्रीमती विद्या कासले, सहाय्यक विशेष सरकारी अभियोक्ता यांच्या व्यावसायिक फी मध्ये सुधारणा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग,
शासन निर्णय क्रमांक:- एसपीपी-०८१७/प्र.क्र.१८३/पोल-१०,
गृह विभाग, २ रा मजला, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादम कामा मार्ग,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०२ ऑगस्ट, २०१९

संदर्भ :- १) शासन अधिसूचना, विधि व न्याय विभाग क्र.एसपीपी २०१७/यु.ओ.आर.४४/डी-१४, दिनांक ११.०८.२०१७,
२) शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक एसपीपी ०८१७/प्र.क्र.१८३/पोल-१०, दिनांक ०५.०२.२०१८
३) पोलीस आयुक्त (प्रकटीकरण), गुन्हे शाखा, बृहन्मुंबई यांचे पत्र जावक क्रमांक ९२६/२०१९, दिनांक १४.०६.२०१९

शासन निर्णय :-

गुन्हे प्रकटीकरण शाखा, गु.र.क्र.२७/२०१७ (नागपाडा पोलीस ठाणे, गु.र.क्र. २६३/२०१७) मधुन उद्भवणाऱ्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये न्यायलयातील कामकाज पाहण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या विशेष सरकारी अभियोक्ता ॲड श्रीमती विद्या कासले यांना संदर्भाधीन वाचा क्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये ॲड श्रीमती विद्या कासले यांना प्रतिदिन परिणामकारक सुनावणी फी रुपये १०,०००/- दराने व्यावसायिक फी अदा करण्यास मान्यता देण्यात आली होती.

२. उपरोक्त संदर्भाधीन वाचा क्रमांक ३ येथील पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) गुन्हे शाखा, बृहन्मुंबई यांच्या प्रस्तावास अनुसरुन ॲड श्रीमती विद्या कासले यांना खालील प्रमाणे सुधारीत दराने व्यावसायिक फी अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

अ) प्रतिदिन परिणामकारक सुनावणी फी .. .. रुपये २०,०००/-

ब) प्रतिदिन विचारविनिमय फी .. .. रुपये ३,५००/-

तसेच सदर व्यावसायिक फी व्यतिरिक्त ॲड श्रीमती विद्या कासले यांना अन्य कोणतेही लाभ अनुज्ञेय होणार नाहीत.

३. परिणामकारक सुनावणीचे दिवस संबंधीत प्रकरणाच्या पर्यवेक्षीय पोलीस उपायुक्त दर्जाहून कमी नाही, अशा अधिकाऱ्याकडून प्रमाणित करुन घेण्यात यावेत व कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त प्रदान होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

४. यासाठी येणारा खर्च या विभागाच्या मागणी क्रमांक बी - १, २०५५ पोलीस - (००) १०८, राज्य मुख्यालय पोलीस (०२)(०१) शहर पोलीस आस्थापना - (२०५५ ००९७) - २८ व्यावसायिक सेवा या लेखाशिर्षाखालील त्या त्या आर्थिक वर्षाच्या मंजूर अनुदानातून व मासिक निधी विवरणपत्रानुसार भागविण्यात येईल.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक २४३/१९/व्यय ७, दिनांक १६.०७.२०१९ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१९०८०३११५६४९८६२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Kishor Shyamrao Bhalerao

Digitally signed by Kishor Shyamrao Bhalerao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ce6f6edd7e1dfc6b4d6b65b7d93aa1a1dbcf0ec79c7c2143850ff6e8fdcb4c0d, serialNumber=94524ab889e2fa9e6bfe5e1e58426881bc36b968ffd0f45ce2d4bd3ff527ded2, cn=Kishor Shyamrao Bhalerao
Date: 2019.08.03 12:08:21 +05'30'

(किशोर भालेराव)
उप सचिव (विधि), गृह विभाग

प्रत,

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
३. महालेखापाल १(लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
६. ॲड श्रीमती विद्या कासले, २५/२६, डी. एन. मंझील, कॉंग्रेस हाऊस, व्ही. पी रोड, मुंबई ४०० ००४.
७. विधि व न्याय विभाग (का-१४), मंत्रालय, मुंबई.
८. वित्त विभाग (व्यय-७), मंत्रालय, मुंबई.
९. निवड नस्ती/पोल-१०.